

दैनिक आकर्षण

संपादक : विजय सांगळे



वर्ष ६ ▮ अंक ४४ ▮ शुक्रवार ६ नोव्हेंबर २०२६ ▮ पाने ४ मूल्य ₹ २ https://epaper.dainikaakarshan.com E-mail- dainikaakarshan@gmail.com RNI NO. MAHMAR/2021/84322

जिल्हा बँक अध्यक्ष निवडीसाठी राजकीय घडामोडींना वेग

डॉ. सुजय विखे पाटील यांच्या नावावर मुंबईतून शिक्कामोर्तब होण्याचे संकेत

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालक मंडळाची निवडणूक प्रक्रिया नुकतीच पार पडल्यानंतर, आता बँकेच्या अध्यक्षपदी कोणाची वर्णी लागणार? याकडे संपूर्ण जिल्ह्याच्या नजरा लागल्या आहेत. सद्यस्थितीत जिल्ह्याच्या राजकीय वर्तुळात माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांचे नाव अध्यक्षपदासाठी सर्वात आघाडीवर असून, नुकत्याच झालेल्या वरिष्ठ नेत्यांच्या गाठीभेटींमुळे या चर्चेला भक्कम पुष्टी मिळत आहे.

जिल्हा बँकेच्या अध्यक्षपदाच्या निवडीवरून सध्या मुंबई ते अहिल्यानगर अशा राजकीय घडामोडींना वेग आला आहे. राज्याचे महसूलमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी नुकतीच ना. राम शिंदे यांची भेट घेतली. या दोन दिग्गज नेत्यांच्या भेटीमुळे अध्यक्षपदाच्या समीकरणांवर शिक्कामोर्तब झाल्याचे बोलले जात आहे.

तत्पूर्वी, ना. राम शिंदे यांनी मुंबईत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन चर्चा केली होती. विशेष म्हणजे, जिल्हा बँकेचा अध्यक्ष कोण असेल, याचा अंतिम निर्णय मुख्यमंत्री आणि वरिष्ठ नेतेच ठरवतील, अशी जाहीर भूमिका निवडणुकीनंतर लगेचच झालेल्या पत्रकार परिषदेत सुजय विखे पाटील यांनी व्यक्त केली होती. या सर्व साखळी भेटी आणि नेत्यांची विधाने पाहता, डॉ. सुजय विखे यांच्या नावावर वरिष्ठ पातळीवरून एकमत होण्याचे संकेत मिळत आहेत.



सहकारावर पकड मजबूत करण्याचा भाजपचा प्रयत्न

अहिल्यानगर जिल्हा सहकारी बँक ही राज्यातीला एक अग्रगण्य बँक असून, नुकत्याच पार पडलेल्या संचालक मंडळाच्या निवडणुकीत जिल्ह्यातील सर्वच प्रस्थापित नेत्यांनी आपली ताकद पणाला लावली होती. बँकेवरील वर्चस्व म्हणजे जिल्ह्यातील हजारो शेतकरी आणि सहकारी संस्थांवरील पकड मजबूत करणे, हे सूत्र असल्याने या निवडणुकीला विधानसभेइतकेच महत्त्व प्राप्त झाले होते. सहकारातील या महत्त्वपूर्ण संस्थेवर यापूर्वी काँग्रेस व राष्ट्रवादीचे वर्चस्व राहिलेले आहे. यावेळी मुख्यमंत्र्यांकडूनच अध्यक्ष ठरविला जाणार असल्याचे सुरुवातीलाच सांगण्यात आल्याने अध्यक्ष भाजपचाच होणार यावर शिक्कामोर्तब झाले आहे. भाजपकडून या स्पर्धेत विखे व शेवगाव-पाथर्डीच्या आमदार मोनिका राजळे यांचीच नावे आहेत. संचालक मंडळाच्या निवडीत विखे गटाने आणि त्यांच्या मित्रपक्षांनी मिळवलेले घवघवीत यश पाहता, अध्यक्षपदावर त्यांचाच दावा सर्वात प्रबळ मानला जात आहे. या निमित्ताने भाजपचाही जिल्ह्याच्या सहकार क्षेत्रावरील पकड मजबूत करण्याचा प्रयत्न राहणार आहे.

अधिकृत घोषणेची प्रतीक्षा?

माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांना जिल्ह्याच्या राजकारणात आणि सहकार क्षेत्रात पुन्हा एकदा भक्कमपणे प्रस्थापित करण्यासाठी जिल्हा बँकेचे अध्यक्षपद ही एक महत्त्वाची पायरी मानली जात आहे. अलीकडच्या काळातील या सर्व राजकीय घडामोडी, नेत्यांमधील समन्वय आणि वरिष्ठांच्या गाठीभेटी पाहता, जिल्हा बँकेच्या अध्यक्षपदी डॉ. सुजय विखे यांचीच वर्णी लागणार अशी खात्रीलायक माहिती राजकीय गोटातून मिळत आहे. आता केवळ या निर्णयाच्या अधिकृत घोषणेची औपचारिकता बाकी असल्याचे कार्यकर्त्यांचे म्हणणे आहे.



आज दीपावलीचा पहिला दिवस वसुबारस या निमित्त माणिकनगर येथील सोनल लोढा यांनी अतिशय आकर्षक रांगोळी काढली होती. (छाया - राजू खरपुडे ,नगर)

गहाळ झालेले ८७ मोबाईल मूळ मालकांना केले परत

नगर शहर उपविभागातील पोलीस ठाण्यांची कामगिरी

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– अहिल्यानगर शहर उपविभागातील कोतवाली, तोफखाना आणि भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यांच्या हद्दीतून हरवलेले तसेच चोरीला गेलेले तब्बल १८ लाख ८५ हजार रुपये किमतीचे ८७ मोबाईल शोधण्यात पोलिसांना मोठे यश आले आहे. जप्त केलेले हे सर्व मोबाईल आज (दि. ६ नोव्हेंबर) उपविभागीय पोलीस अधिकारी दिलीप टिपरसे यांच्या प्रमुख उपस्थितीत मूळ मालकांना सुपूर्द करण्यात आले. आपला हरवलेला मोबाईल पुन्हा मिळाल्याने नागरिकांनी पोलिसांचे आभार मानले आहेत.

अहिल्यानगर पोलीस दलाने तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे मोबाईल शोधण्याची विशेष मोहीम हाती घेतली होती. यामध्ये शहर विभागातील कोतवाली, तोफखाना व भिंगार कॅम्प हद्दीतील तक्रारींची दखल घेत तब्बल ८७ मोबाईल शोधून काढण्यात आले. नागरिकांच्या तक्रारींचे निवारण करत त्यांना त्यांचे गहाळ झालेले व चोरीस गेलेले मोबाईल परत मिळवून देण्यात पोलिसांना यश आले आहे.



कोणत्या पोलीस ठाण्याच्या हद्दीत किती मोबाईल मिळाले?

कोतवाली पोलीस स्टेशन ५४ मोबाईल (किंमत १४ लाख रुपये)
तोफखाना पोलीस स्टेशन - २५ मोबाईल (किंमत ४ लाख रुपये)
भिंगार कॅम्प पोलीस स्टेशन - ८ मोबाईल (किंमत ८५ हजार रुपये)

यांच्या पथकाने केली कारवाई

ही महत्त्वपूर्ण कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे आणि शहर विभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी दिलीप टिपरसे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. यामध्ये कोतवालीचे पोलीस निरीक्षक नितीन देशमुख, पोलीस निरीक्षक बालाजी वैद्य, सहायक पोलीस निरीक्षक श्रीमती तेजश्री थोरात, तसेच पोलीस अंमलदार महेश पवार, सचिन बाचकर आणि संदीप थोरात यांनी तांत्रिक तपास करत विशेष परिश्रम घेतले.

धनत्रयोदशीला सोने घसरले

मुंबई वृत्तसंस्था – धनत्रयोदशीचा मुहूर्त सोने खरेदीचा मुहूर्त मानला जातो. या दिवशी केलेली सोने खरेदी ही शुभ असते, समृद्धी देणारी असते अशी ग्राहकांची श्रद्धा असल्याने या मुहूर्तावर सोने खरेदी करण्यासाठी ग्राहक प्राधान्य देतात. सोन्याच्या दरात काल(गुरूवार, ता ५) पेक्षा आज (शुक्रवारी, ता ६) साडेतीन हजार रुपयांची घसरण होऊन काल असलेले १४४००० हजार रुपयांचे सोन्याचे दर आज १४१५०० वर खाली आले आहेत



तर चांदीच्या दरात ही चार हजार रुपयांची घसरण होऊन ते १८६००० वर खाली आल्याने काही प्रमाणात का होईना सोने खरेदी मुहूर्तावर ग्राहकांना आज मोठा दिलासा मिळाला आहे.

धनत्रयोदशीच्या मुहूर्तावर सकाळ पासून ग्राहक सोने खरेदी करतांना पाहायला मिळत आहे. गेल्या काही महिन्याच्या तुलनेने सोन्याच्या दरात ४० हजाराची घट झाल्याने या वर्षी आज धनतेरसला ३० टक्के अधिक सोने खरेदी होण्याची शक्यता आहे. महाराष्ट्रात २५ टन तर देशात १०० ते १२५ टन सोन्याची उलाढाल होणार असल्याचे ऑल इंडिया ज्वेलरी असोशिएशन अध्यक्ष राजेश रोकडे यांनी सांगितले आहे.

राहुल गांधी काँग्रेसमध्ये जितके पुढे गेले, पक्ष तितकाच मागे पडत गेला

राहुल गांधींनी कोणत्याही चौकाचे नाव सांगावे, भाजपचा युवा मोर्चाचा अध्यक्षच त्यांच्याशी चर्चेसाठी पुरेसा आहे । भाजपचे कार्यकर्ते शेतापासून ते रस्त्यापर्यंत राहुल गांधींच्या प्रचाराला उत्तर देतील



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– हरियाणातील करनालच्या रस्त्यांवर 'लोकशाही वाचवा, अराजकता दूर करा' या पदयात्रेचा शेवटचा टप्पा सुरू झाला. यावेळी केंद्रीय गृहमंत्री आणि सहकार मंत्री अमित शाह यांनी काँग्रेस आणि राहुल गांधी यांच्या राजकारणावर जोरदार टीका केली. त्यांच्या या वक्तव्यामुळे राजकीय वर्तुळात नव्या चर्चेला सुरुवात झाली आहे. 'नव्या भारताचे चाणक्य' अशी ओळख असलेल्या अमित शाह यांनी आपल्या राजकीय शैलीत काँग्रेसच्या रणनीतीला आव्हान दिले. लोकशाहीमध्ये निवडणुकीतील पराभवाचे उत्तर आरोप करून नव्हे, तर जनतेसमोर आपले काम आणि मुद्दे मांडून द्यावे लागते, असा स्पष्ट संदेश त्यांनी दिला.

राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेसची राजकीय ताकद सातत्याने कमी होत असल्याची टीका अमित शाह यांनी केली. आपल्या रणनीतीने विरोधकांना मात देणाऱ्या अमित शाह यांनी काँग्रेसच्या निवडणुकीतील पराभवाचा आढावा घेतला. २००७ मध्ये राहुल गांधी काँग्रेसचे सरचिटणीस झाले, तेव्हा पक्षाकडे सुमारे १,२०० आमदार होते. ते उपाध्यक्ष झाले, तेव्हा ही संख्या ९०० वर आली. पक्षाचे अध्यक्ष झाल्यानंतर ती ७०० झाली आणि २०२२ मध्ये भारत जोडो यात्रेच्या वेळी ही संख्या कमी होऊन सुमारे ६०० वर आली. या आकडेवारीमुळे काँग्रेसमधील नेतृत्व आणि पक्षाच्या राजकीय दिशेबाबत गंभीर प्रश्न निर्माण होतात. एकीकडे राहुल गांधी पक्षात पुढे जात राहिले, तर दुसरीकडे काँग्रेसचा पाठिंबा आणि राजकीय प्रभाव कमी होत गेला. हरियाणा, महाराष्ट्र, दिल्ली आणि इतर राज्यांतील निवडणुकांचे निकालही काँग्रेसच्या या घसरत्या राजकीय ताकदीचे उदाहरण म्हणून पाहिले जात आहेत.

शाह यांनी संसदेच्या प्रतिष्ठेचीही आठवण करून दिली. लोकशाहीचे सर्वोच्च व्यासपीठ हे चर्चा करण्यासाठी आहे, गर्दी आणि गोंधळ घालण्यासाठी नाही. निवडणूक जिंकल्यावर काँग्रेस जनतेचा कौल स्वीकारते, मात्र पराभव झाल्यावर ईव्हीएम आणि निवडणूक आयोगावर आरोप करते, ■ पान ४ वर

मर्चंटस बँकेच्या सभासदांना ३ कोटी ५ लाखांच्या लाभांशाचे वाटप - चेअरमन संजय चोपडा

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– अहमदनगर मर्चंटस को ऑप बँकेने सन २०२५ - २०२६ या आर्थिक वर्षासाठी जाहीर केलेला १५ टक्के लाभांश सभासदांच्या बँकेतील खात्यावर जमा करण्यात आला आहे. दिवाळीच्या मोठ्या उत्सव काळात हा लाभांश सभासदांना प्राप्त झाला आहे. उत्कृष्ट आर्थिक कारभाराची परंपरा कायम ठेवत बँकेने सभासदांना ३ कोटी ५ लाख रुपये लाभशांपैकी २ कोटी १० लाख सभासदांच्या खात्यात वर्ग केले आहेत तसेच बँकेत खाते नसलेल्या सभासदांनी आपला लाभांश त्वरित घेऊन जाण्याबाबत माहिती चेअरमन संजय चोपडा यांनी दिली.

चेअरमन संजय चोपडा यांनी सांगितले की, बँकेचे संस्थापक चेअरमन हस्तीमलजी मुनोत यांच्या नेतृत्वाखाली बँकेने सभासदांची विश्वासाहर्ता कायम जपली आहे. अत्याधुनिक बँकिग सेवा देतानाच काटकसरीने कारभार आणि सभासद हित याला नेहमीच प्राधान्य दिले जाते. स्पर्धेच्या युगात सर्वोत्कृष्ट डिजिटल बँकिग सेवा दिली जाते. विविध कर्ज योजनांतून व्यापार, व्यवसाय, उद्योगांना चालना दिली जाते. मर्चंटस बँक जिथे,



लक्ष्मी वास करे तिथे हे ब्रीद सार्थ ठरवणारी वाटचाल बँकेचे वैशिष्ट्य आहे. याही वर्षी दिवाळी आधी बँकेत खाते असणाऱ्या सभासदांना लाभांश वितरण करण्यात आले आहे व ज्या सभासदांचे खाते बँकेत नाही अशा सभासदांनी आपले खाते लवकरात लवकर उघडून घ्यावे व लाभांश आपल्या खाती जमा करून घ्यावा तसेच ज्या सभासदांचे खाते असेल अशा सभासदांनी आपले खाते कार्यान्वित करावे असे आवाहन चेअरमन संजय चोपडा यांनी केले व सर्व सहकारी संचालक, बोर्ड ऑफ मॅनेजमेंटचे सदस्य, मुख्य कार्यकारी अधिकारी नितीन भंडारी, बँकेचे अधिकारी व कर्मचारी यांचे सहकार्य लाभल्याचे त्यांनी सांगितले.

दै. आकर्षण निवडक

जैन सोशल फेडरेशन संचलित दिवाळी फराळ महोत्सवाला नागरिकांचा प्रतिसाद



अहिल्यानगर- दिवाळी म्हटले की घराघरांत फराळाची लगबग, खरेदीची धावपळ आणि विविध पदार्थ तयार करण्याची तयारी सुरू होते. मात्र, वाढती महागाई, वेळेची कमतरता आणि घरगुती जबाबदाऱ्यांमुळे महिलांसाठी दिवाळीचा फराळ तयार करणे अनेकदा मोठे आव्हान ठरते. अशा परिस्थितीत सर्वसामान्य नगरकरांची दिवाळी गोड करणारा जैन सोशल फेडरेशन संचलित भगवान महावीर भवन येथील दिवाळी फराळ महोत्सव नागरिकांच्या पसंतीस उतरला आहे. सलग १४ व्या वर्षी सुरू झालेल्या या महोत्सवाच्या उद्घाटनानंतर फराळ खरेदीसाठी नागरिकांनी मोठी गर्दी झाली असून, अक्षरशः रांगा लागल्या आहेत.स्टेशन रोडवरील भगवान महावीर भवन येथे आयोजित या महोत्सवात 'ना नफा, ना तोटा' या तत्त्वावर दर्जेदार फराळ माफक दरात उपलब्ध करून देण्यात आला आहे. महागाई आणि दुष्काळाचे सावट असतानाही सर्वसामान्यांना परवडणाऱ्या किमतीत स्वच्छ, आरोग्यदायी वातावरणात तयार केलेला फराळ उपलब्ध करून देण्याची परंपरा यंदाही कायम ठेवण्यात आली आहे. उद्घाटनानंतर नागरिकांनी विविध फराळ पदार्थांच्या खरेदीसाठी दालनात गर्दी केली.या महोत्सवाचे सर्वाधिक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे महिलांची दिवाळीची धावपळ आणि ताण कमी होण्यास मिळणारी मदत. दिवाळीच्या दिवसांत घराची स्वच्छता, सजावट, पूजा, पाहुण्यांचे स्वागत आणि इतर कामांमध्ये महिलांचा बराच वेळ जातो. त्यातच फराळाचे विविध पदार्थ तयार करण्यासाठी लागणारा वेळ, मेहनत आणि खर्च यांची भर पडते. अशा वेळी तयार फराळ उपलब्ध असल्याने महिलांना मोठा दिलासा मिळत आहे. फराळ तयार करण्यासाठी लागणारा वेळ वाचतो, विविध साहित्य खरेदीचा खर्च आणि कष्ट कमी होतात. त्यामुळे कुटुंबीयांसोबत सणाचा आनंद घेण्यासाठी अधिक वेळ मिळतो.या महोत्सवाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे नागरिकांना आवश्यकतेनुसार आणि हव्या त्या प्रमाणात फराळ खरेदी करता येतो. घरातील सदस्यसंख्या, पाहुण्यांची ये-जा आणि गरज लक्षात घेऊन थोड्या किंवा अधिक प्रमाणात फराळ घेण्याची सुविधा असल्याने अनावश्यक खर्च आणि पदार्थांची नासाडी टाळता येते. एकाच ठिकाणी विविध प्रकारचे पदार्थ उपलब्ध होत असल्याने वेगवेगळ्या दुकानांमध्ये फिरण्याचीही गरज राहत नाही. त्यामुळे वेळ आणि पैशांची बचत होत असून, नोकरदार कुटुंबे, ज्येष्ठ नागरिक आणि व्यस्त गृहिणींसाठी हा महोत्सव सोयीचा ठरत आहे.बुंदीचे लाडू, मसाला शेव, चिवडा, शंकरपाळे, सोनपापडी यांसह विविध प्रकारचे पारंपरिक दिवाळी फराळाचे पदार्थ येथे उपलब्ध आहेत.

फुलांचे व्यापारी नईम खान यांचे अभिष्टचिंतन मित्रपरिवाराकडून सत्कार



अहिल्यानगर - कृषी उत्पन्न बाजार समिती, अहिल्यानगर येथील फुलांचे व्यापारी नईम खान यांच्या वाढदिवसानिमित्त मित्रपरिवार, व्यापारी बांधव यांच्यावतीने सत्कार करून त्यांचे अभिष्टचिंतन करण्यात आले.व्यापारी क्षेत्रात आपल्या मनमिळाऊ स्वभावामुळे आणि सर्वांशी जिव्हाळ्याचे संबंध जपणारे नईम खान यांचा वाढदिवस मित्रपरिवाराने उत्साहात साजरा केला. यावेळी वसंत मामा अगरकर, भाऊ पानमलकर, गणेश पानमलकर, दादा ठोकळ, गणेश गोधले, रोहन धाडगे, अजय तिवारी, रईस खान, जाफर खान, सुफियान खान आदी उपस्थित होते.उपस्थितांनी नईम खान यांना उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य आणि व्यवसायात भरभराट लाभो, अशा शुभेच्छा दिल्या.

ढोकेश्वर विद्यालयात फटाकेमुक्त, पर्यावरणपूरक दिवाळी साजरी करण्याची विद्यार्थ्यांना शपथ



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

टाकळीढोकेश्वर– महाराष्ट्र राज्यातील दुष्काळी परिस्थिती आणि पर्यावरण संवर्धनाची गरज लक्षात घेऊन फटाकेमुक्त व पर्यावरणपूरक दिवाळी साजरी करण्याचा संकल्प श्री ढोकेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, टाकळी ढोकेश्वर येथे करण्यात आला.

यावेळी विद्यालयाचे प्राचार्य बाळासाहेब खिलारी यांनी विद्यार्थ्यांना फटाके न फोडता पर्यावरणपूरक दिवाळी साजरी करण्याची शपथ दिली. दिवाळी हा आनंदाचा आणि प्रकाशाचा सण आहे. मात्र, फटाक्यांमुळे होणारे वायुप्रदूषण, ध्वनिप्रदूषण तसेच पाण्याचा व इतर नैसर्गिक साधनसंपत्तीचा अपव्यय टाळणे ही काळाची गरज आहे. दुष्काळी परिस्थितीचे गांभीर्य ओळखून पाणी बचत करणे, पर्यावरणाचे रक्षण करणे आणि सामाजिक बांधिलकी जपणे, असा संदेश यावेळी विद्यार्थ्यांना देण्यात आला.या उपक्रमातून विद्यार्थ्यांनी बोध घेऊन स्वतः फटाके न फोडण्याबरोबरच आपल्या कुटुंबीयांना व परिसरातील नागरिकांनाही पर्यावरणपूरक दिवाळी साजरी करण्यासाठी प्रोत्साहित करावे असे आवाहन पर्यवेक्षक बाळासाहेब निवडुंगे यांनी विद्यार्थ्यांना केले.

या प्रसंगी शास्त्र समन्वयक प्रा. अशोक गांगड, प्रा. राजेंद्र ढोणे, आतिष झावरे, योगेश मांडगे, देविदास आठरे, पोपट जगदाळे, नितीन ढोकळे, भाऊसाहेब हिंगडे, सचिन महानवर, बाबासाहेब जाधव, सुनील झावरे, रविंद्र मते, निलम खिलारी,सुमन वाळुंज, नारायण शेळके, निलेश पाचर्णे, संदीप महांडुळे, अतुल सैद, सोनल रोहकले, वैशाली गायखे, श्रीरंग धामणे, सुरेखा ठाणगे, प्रिया डव्हणे, कल्पना जाधव, मंगेश पोपळघट, रामदास नरवडे, सिमा खोसे, सुवर्णा दिघे, संजना विश्वासराव, कृपा खरे, विष्णू भद्रे, श्वेता शिर्के, दिनेश वायदंडे, स्वप्नील कदम, वसंत वाघेरे, रईसाबी शेख तसेच विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

यतीमखाना ट्रस्टच्या वतीने राष्ट्रीय पुरस्कारप्राप्त शिक्षणाधिकारी संध्या गायकवाड यांचा सन्मान

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– अहमदनगर यतीमखाना ट्रस्ट संचलित अहमदनगर हायस्कूल (मराठी माध्यम) आणि जकरीया आघाडी प्राथमिक शाळेच्या वतीने शिक्षणाधिकारी (माध्यमिक) श्रीमती संध्या गायकवाड यांना राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल त्यांचा सत्कार सोहळा उत्साहात संपन्न झाला. यावेळी मा. जिल्हा समाजकल्याण अधिकारी रफिक मुंशी यांच्या हस्ते श्रीमती गायकवाड यांना सन्मानचिन्ह प्रदान करून त्यांचा गौरव करण्यात आला.

या कार्यक्रमास प्राचार्या मेघना राजेंद्र कुलकर्णी आणि मुख्याध्यापिका शमीम पठाण उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षिका इशा तांबोळी यांनी केले. याप्रसंगी शिक्षणाधिकारी संध्या गायकवाड यांनी अहमदनगर यतीमखाना ट्रस्ट संचलित शाळांना सदिच्छा भेट दिली. यावेळी त्यांनी वसतिगृहातील विद्यार्थ्यांशी संवाद साधला. विद्यार्थ्यांमधील आपुलकी, शिस्त,



आत्मविश्वास आणि एकमेकांशी असलेले जिव्हाळ्याचे नाते पाहून त्यांनी विशेष समाधान व्यक्त केले. वसतिगृहातील वातावरणात विद्यार्थी अत्यंत आनंदाने, मोकळेपणाने आणि एकोप्याने राहत असल्याचे पाहून त्यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या कुराण पठणाचेही त्यांनी विशेष कौतुक केले. आपल्या मनोगतात त्या म्हणाल्या, ''प्रत्येक मूल हे वेगळे आणि वैशिष्ट्यपूर्ण असते. प्रत्येक विद्यार्थ्यामध्ये काही ना काही विशेष गुण असतात. शिक्षकांनी विद्यार्थ्यांमधील हे गुण ओळखून त्यांना योग्य दिशा द्यावी आणि त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास घडवावा.''

दिवाळीच्या नव्या कपड्यांसाठी चिमुकल्याची कापसाच्या शेतात मजुरी!

आई–वडिलांच्या कष्टांना हातभार लावण्यासाठी इवल्या हातांनी कापूस वेचला; शेतकरी कुटुंबातील आर्थिक परिस्थितीचे हृदयस्पर्शी वास्तव

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

पैठण– दिवाळी म्हटले की प्रत्येकाच्या घरी आनंद, उत्साह आणि नवीन कपड्यांची खरेदी सुरू होते. मात्र, शेतकरी कुटुंबातील मुलांसाठी दिवाळीचा आनंद मिळवण्यामागेही संघर्ष आणि कष्टांची कहाणी दडलेली असते. आई-वडिलांना दिवाळीच्या सणाला नवीन कपडे घेता यावेत, या भावनेतून एका चिमुकल्याने आपल्या इवल्याशा हातांनी कापसाच्या शेतात कापूस वेचण्याचे काम सुरू केले आहे.
कापसाने बहरलेल्या शेतात हा चिमुकला कापूस वेचताना दिसत असून, त्याच्या शेजारी कापसाने भरलेले पोतेही दिसत आहे. ज्या वयात मुलांच्या हातात खेळणी आणि शाळेची पुस्तके असायला हवीत, त्या वयात कुटुंबाच्या परिस्थितीची



जाणीव ठेवून तो शेतात कष्ट घेत असल्याचे हृदयस्पर्शी चित्र समोर आले आहे.

आजच्या महागाईच्या काळात शेतकरी कुटुंबाला शेतीतून अपेक्षित उत्पन्न मिळत नसल्याने सण-उत्सव साजरे करतानाही अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे.
दिवाळीला नवीन कपडे घालण्याचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी या चिमुकल्याने घेतलेले कष्ट अनेकांच्या मनाला चटका लावणारे आहेत.

दिवाळीचा आनंद बाजारातील महागड्या कपड्यांत नसून, त्या कपड्यांमागे आई-वडिलांनी घेतलेल्या कष्टांची जाणीव ठेवण्यात आहे. एका चिमुकल्याच्या या कष्टमय चित्रातून शेतकरी कुटुंबाचे वास्तव आणि ग्रामीण भागातील आर्थिक परिस्थिती पुन्हा एकदा अधोरेखित झाली आहे.

वर्धमान महावीर स्कूलमध्ये दिवाळी कार्निव्हल उत्साहात साजरा

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– जैन सोशल फेडरेशन संचालित वर्धमान महावीर स्कूलमध्ये विद्यार्थ्यांनी दिवाळी उत्सवाचा आनंद लुटला. दोन दिवसीय दिवाळी कार्निव्हलचा शुभारंभ दीपप्रज्वलनाने झाला. यावेळी प्राचार्या रेणुका जोशी, केदार वाळिंबे, जैन सोशल फेडरेशनचे संतोष बोथरा, निखिलेंद्र लोढा, बाबूशेठ लोढा, माणिकचंद कटारिया,सुनील मालू आदी उपस्थित होते.

नगर – कल्याण रोडवरील भव्य परिसरातील वर्धमान महावीर शैक्षणिक संकुलात प्राथमिक स्कूल, नर्सिंग कॉलेज सुरू आहे. दिवाळीचा सर्वांनी एकत्रित आनंद घ्यावा यासाठी या दिवाळी कार्निव्हल आयोजन करण्यात आले होते. कार्निव्हलमध्ये विद्यार्थ्यांसाठी विविध सांस्कृतिक, शैक्षणिक आणि मनोरंजनात्मक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सर्व कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या कठपुतळी शोद्वारे दिवाळीचे धार्मिक, सांस्कृतिक महत्त्व, परंपरा यांचे सुंदर सादरीकरण करण्यात आले. मुलामुलींनी महाराष्ट्राची ऐतिहासिक ओळख असलेल्या गड किल्ल्यांच्या प्रतिकृती बनवून आपला देदीप्यमान इतिहासाची उजळणी केली. कार्निव्हलमध्ये दिवाळीशी संबंधित परंपरांची माहिती देण्यात आली. दुसऱ्या दिवशी विद्यार्थ्यांनी पणत्या सजवणे, शुभ-लाभ तयार करणे, रांगोळी काढणे अशा कलात्मक उपक्रमांमध्ये उत्साहाने सहभाग घेतला.

कार्निव्हलच्या निमित्ताने संध्याकाळी भजन संध्येचे आयोजन करण्यात आले होते. यासोबतच विद्यार्थ्यांनी विविध खेळांचे व खाद्यपदार्थांचे स्टॉल लावून उपस्थितांची मने जिंकली. विद्यार्थी, पालक, शिक्षकांनी दोन्ही दिवस कार्निव्हलमध्ये सहभाग घेऊन उत्सवाचा आनंद लुटला व एकमेकांना दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या. परंपरा, संस्कृती, सर्जनशीलता आणि आनंद यांचा सुंदर संगम असलेला हा दोन दिवसीय दिवाळी कार्निव्हल विद्यार्थ्यांसह पालकांसाठीही अविस्मरणीय ठरला. संपूर्ण कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात आणि आनंदात संपन्न झाला.

एस.एन.एज्युकेअर इंटरनॅशनल स्कूलमध्ये दिवाळी सणानिमित कार्यशाळा

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

पारनेर– एस.एन. एज्युकेअर इंटरनॅशनल स्कूल, खडकवाडी येथे दिवाळीनिमित्त दिवाळी सेलिब्रेशन मोठ्या उत्साहात व आनंददायी वातावरणात पार पडले. विद्यार्थ्यांमधील कलागुणांना वाव मिळावा, त्यांच्यातील सर्जनशीलता विकसित व्हावी आणि भारतीय संस्कृती व परंपरांची ओळख व्हावी, या उद्देशाने शाळेत विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

या निमित्ताने विद्यार्थ्यांसाठी आकाशकंदील बनवणे, पणत्या रंगवणे आणि आकर्षक ग्रीटिंग कार्ड तयार करणे यांसारख्या कलात्मक कार्यशाळा आयोजित करण्यात आल्या. विद्यार्थ्यांनी या उपक्रमांमध्ये उत्स्फूर्त सहभाग घेत आपल्या कल्पकतेतून सुंदर व आकर्षक कलाकृती साकारल्या. या उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांना हस्तकलेचा



आनंद मिळण्याबरोबरच स्वनिर्मितीचा आत्मविश्वास, कलात्मकता आणि सणांचे सांस्कृतिक महत्त्व समजण्यास मदत झाली.

शाळेतील शिक्षकवृंदांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून या उपक्रमाचे उत्तम नियोजन केले. विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे संपूर्ण शाळा परिसरात दिवाळीचा आनंद, उत्साह आणि चैतन्याचे वातावरण निर्माण झाले.

कलेतून आनंद, संस्कृतीतून संस्कार आणि शिक्षणातून उज्ज्वल भविष्य! या विचारातून शाळेने दिवाळीचा सण विद्यार्थ्यांसाठी अविस्मरणीय केला. संस्थेचे अध्यक्ष प्रा.नितीन ढोकळे सर यांनी प्राचार्य सौ.शुभांगी ढोकळे मॅडम,तसेच इतर सर्व शिक्षक वृंद राणी गागरे मॅडम , रुपाली हारदे मॅडम, वर्षा टोपले मॅडम ,सुप्रिया सुरे मॅडम ,हर्षदा हारदे मॅडम व आकांक्षा जाधव मॅडम यांचे हार्दिक आभार मानले. शिक्षक वृंद आणि इतर कर्मचाऱ्यांना दीपावली गिफ्ट देऊन हार्दिक शुभेच्छा दिल्या.

प्रभाग क्रमांक दहामधील दूषित पाणी, मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करा!

। बंद अवस्थेतील सुलभ शौचालय तातडीने सुरू करण्याचीही मागणी
। नगरसेविका शितलताई ढोणे यांचे महापौर ज्योतीताई गाडे व आयुक्त यशवंत डांगे यांना निवेदन

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– महानगरपालिकेच्या प्रभाग क्रमांक दहामध्ये गेल्या सहा ते सात महिन्यांपासून नागरिकांना दूषित, पिवळसर, गढूळ व दुर्गंधीयुक्त पाणीपुरवठा होत असल्याने नागरिकांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. तसेच प्रभागात मोकाट कुत्र्यांचा वावर वाढल्यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले असून, बंद अवस्थेत असलेले सुलभ शौचालय तातडीने सुरू करण्यात यावे, अशी मागणी नगरसेविका शितलताई अजय ढोणे यांनी केली आहे. यासंदर्भात त्यांनी महापौर ज्योतीताई गाडे व आयुक्त यशवंत डांगे यांना निवेदन दिले आहे.

निवेदनात म्हटले आहे की, प्रभाग क्रमांक दह्यातील झेंडीगेट परिसरातील ईदगाह मैदानामागे शितळादेवी मंदिराजवळ गेल्या सहा ते सात महिन्यांपासून नळाद्वारे अत्यंत दूषित, पिवळसर रंगाचे, गढूळ व दुर्गंधीयुक्त पाणी येत आहे. या दूषित पाण्यामुळे परिसरातील नागरिकांना पोटदुखी, उलट्या, जुलाब व ताप यांसारख्या आजारांचा सामना करावा लागत आहे. घाण पाणीपुरवठ्यामुळे नागरिक त्रस्त झाले असून, या समस्येबाबत ८ एप्रिल २०२६,



७ मे २०२६, १८ मे २०२६ आणि ३० ऑक्टोबर २०२६ रोजी आयुक्तांकडे लेखी निवेदने देण्यात आली आहेत. पाणीपुरवठा विभागाचे अधिकारी व कर्मचाऱ्यांनी अनेकदा पाहणी करूनही अद्याप ठोस कार्यवाही झालेली नसल्याचे त्यांनी नमूद केले आहे.

प्रभागातील जे.जे. गल्ली येथील आठ ते दहा घरांना मागील आठ ते दहा महिन्यांपासून केवळ पाच मिनिटे पाणीपुरवठा होत आहे. या ठिकाणापासून अवघ्या दहा फुटांच्या अंतरावर दुसरी पाणीपुरवठा करणारी पाइपलाइन असून, त्या पाइपलाइनला संबंधित भागातील पाणीपुरवठ्याची जोडणी दिल्यास पाणीपुरवठा सुरळीत होऊ शकतो, असे निवेदनात सुचविण्यात आले आहे.

तसेच शेरकर गल्ली, बत्तीन बोळ आणि छोटी बेलदार गल्ली या भागांत अनेक दिवसांपासून पुरेसे पाणी येत नसल्याने नागरिकांना पाणी विकत घ्यावे लागत आहे. त्यामुळे नागरिकांवर विनाकारण आर्थिक भार पडत आहे. परिसरात स्वच्छ पाणी आणि पूर्ण दाबाने नियमित पाणीपुरवठा व्हावा, अशी मागणी नागरिकांकडून वारंवार केली जात असल्याचे नगरसेविका ढोणे यांनी निवेदनात स्पष्ट केले आहे.

प्रभाग क्रमांक दह्यात गेल्या काही दिवसांपासून मोकाट कुत्र्यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे. ही कुत्री लहान मुले, शाळकरी विद्यार्थी, महिला आणि ज्येष्ठ नागरिकांच्या अंगावर धावून जात असून, अनेकांना चावा घेतल्याच्या घटना दररोज घडत असल्याचे निवेदनात म्हटले आहे. रात्रीच्या वेळी कुत्र्यांच्या सततच्या भुंकण्यामुळे नागरिकांची झोपमोड होत आहे. तसेच ही कुत्री कचरा पसरवून परिसरात अस्वच्छता निर्माण करीत आहेत. मोकाट कुत्र्यांच्या वाढत्या त्रासामुळे नागरिकांना घराबाहेर पडणेही कठीण झाले असून, या समस्येवर तातडीने उपाययोजना करण्याची मागणी करण्यात आली आहे.

याशिवाय प्रभागातील बंद अवस्थेत असलेले सुलभ शौचालय नागरिकांच्या सोयीसाठी तातडीने सुरू करण्यात यावे, अशीही मागणी नगरसेविका शितलताई ढोणे यांनी केली आहे. प्रभागातील दूषित पाणीपुरवठा, अपुरा पाणीपुरवठा, मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त आणि बंद सुलभ शौचालय सुरू करण्याबाबत संबंधित विभागांना तातडीने योग्य आदेश देऊन नागरिकांच्या समस्या मार्गी लावाव्यात, अशी विनंती त्यांनी महापौर व आयुक्तांकडे केली आहे.

आकर्षण हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी दैनिक आकर्षण प्रिंटर्स , प्लॉट क्र. ९२, भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस- प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक विजय शामराव सांगळे, व्यवस्थापक तुकाराम कामटे, मुख्य कार्यालयाचा
फोन नंबर - ७७७६८१२८११. ई-मेल: dainikaakarshan@gmail.com. (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)
The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at DAINIK AKARSHAN PRINTERS, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). "Editor - Vijay Shamrao Sangale, Manager - Tukaram Kamte, Phone no. of main office-7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com ("The responsibility under the PRB Act will be on him.)

दै. आकर्षण निवडक

अहिल्यानगरमध्ये तब्बल ४५ उत्कृष्ट वादकांचा लाइव्ह ऑर्केस्ट्रासह रंगणार सुरेल संगीताची मैफल



अहिल्यानगर - अहिल्यानगरच्या संगीतप्रेमींसाठी ६ नोव्हेंबर रोजी एका भव्य संगीत सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.दमन काशीद हॉस्पिटल प्रस्तुत हा कार्यक्रम शुक्रवारी सायंकाळी ७.४५ वाजता सहकार सभागृह, अहिल्यानगर येथे रंगणार आहे. या कार्यक्रमात भारतातील लोकप्रिय पार्श्वगायक जोडी आलोकजी काटदरे आणि गुल सक्सेना यांच्यासह डॉ. दमण काशीद व डॉ.गायत्री हे चार गायक आपल्या सुरेल आवाजाने रसिकांना मंत्रमुग्ध करणार आहेत. प्रमुख पाहुणे म्हणून सिने अभिनेत्री पल्लवी वैद्य हे उपस्थित राहणार आहेत.या संगीत मैफलीचे खास आकर्षण म्हणजे तब्बल ४५ उत्कृष्ट वादकांचा लाइव्ह ऑर्केस्ट्रा. दर्जेदार संगीत, अप्रतिम गायन आणि भव्य वाद्यवृंदाच्या साथीने ही मैफल अविस्मरणीय ठरणार आहे. अहिल्यानगरच्या सांस्कृतिक आणि संगीत क्षेत्रातील हा एक भव्य कार्यक्रम ठरण्याची अपेक्षा आहे.

कार्यक्रमासाठी तिकिटांना रसिकांचा मोठा प्रतिसाद मिळत असून, एकूण १००० तिकिटांपैकी केवळ १०० ते १५० तिकिटे शिल्लक असल्याची माहिती आयोजकांकडून देण्यात आली आहे. त्यामुळे हा कार्यक्रम लवकरच हाऊसफुल्ल होण्याची शक्यता आहे. संगीतप्रेमींनी शेवटच्या क्षणाची वाट न पाहता आपली तिकिटे बुक माय शोच्या माध्यमातून ऑनलाइन आरक्षित करावीत.कार्यक्रमासाठी कुलकर्णी इमेजिंग सेंटर, पंडित एक्सीडेंट हॉस्पिटल, ग्लोबल डायग्नोस्टिक सेंटर, साताळकर लोटस सुपर स्पेशलिटी हॉस्पिटलचे सहकार्य लाभले आहे.अधिक माहितीसाठी ज्ञानेश्वर माने ८९५६३ ६३६६८ किंवा डॉ.दमन काशीद ९९७०० ५४६९१ यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.चार गायक, ४५ वादक आणि सुरेल संगीताची अविस्मरणीय मेजवानी अनुभवण्याची ही संधी अहिल्यानगरकरांनी अवश्य साधावी.

निमगाव वाघातील नवनाथ विद्यालयात डोंगरे यांच्या सामाजिक कार्याचा सन्मान

अहिल्यानगर- सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक आणि साहित्यिक क्षेत्रात निस्वार्थपणे योगदान देणारे सामाजिक कार्यकर्ते पै. नाना डोंगरे यांना नाशिक येथे चित्रपट महर्षी दादासाहेब फाळके जयंतीनिमित्त प्रदान करण्यात आलेल्या 'सन्मान कलावंतांचा' पुरस्काराने गौरविण्यात आले. या पुरस्काराबद्दल निमगाव वाघा (ता. नगर) येथील नवनाथ विद्यालयाच्या वतीने त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. यावेळी त्यांना वृक्ष भेट देऊन पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला. त्यांच्या सामाजिक कार्याचा गौरव करत शिक्षकांनी त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.मुख्याध्यापक उत्तम कांडेकर आणि ज्येष्ठ शिक्षिका मंदा साळवे यांच्या हस्ते पै. नाना डोंगरे यांचा वृक्ष देऊन सन्मान केला. यावेळी कचरू कापसे, आप्पासाहेब कदम, शरद भोस, स्वाती इथापे, सुप्रिया ठुबे, तेजस केदारी, रत्नमाला थोरात, मोहिनी धर्माधिकारी, पल्लवी खरात, दिपाली शिरसाठ, दिपाली ठाणगे, निकिता शिंदे, रेखा जरे, तुकाराम पवार, प्रमोद थिटे, राम जाधव, बाळासाहेब कोतकर, आनंद ग्यानाप्पा, लहानू जाधव आदी शिक्षक उपस्थित होते.कलावंत विचार मंच, नाशिक आणि कमल फिल्म प्रोडक्शन, कमल म्युझिक मराठी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कार्यक्रमात पै. नाना डोंगरे यांना नुकताच 'सन्मान कलावंतांचा' हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. त्यांच्या सामाजिक आणि साहित्यिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन हा गौरव करण्यात आला आहे.यावेळी मुख्याध्यापक उत्तम कांडेकर म्हणाले की, नवनाथ विद्यालयात कार्यरत असतानाच पै. नाना डोंगरे यांनी सामाजिक बांधिलकी जपत विविध क्षेत्रांत निस्वार्थपणे योगदान दिले आहे.

गरजूंच्या जीवनात आशेचा दिवा प्रज्वलित करणे हीच खरी दिवाळी- सुशील मुथा

जैन वात्सल्य संस्थातर्फे गरजूंना किराणा, साडी व मिठाई वाटप



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– मनुष्य जीवनात परोपकार अतिशय महत्त्वाचा असतो. भारतीय संस्कृती गरजूंना मदत करण्याची शिकवण देते. साधूसंतही नेहमी दिनदुबळ्यांची सेवा हीच खरी मानवता असल्याचे सांगतात. याच शिकवणुकीतून जैन वात्सल्य संस्था गरजूंना किराणा देऊन मोठे सामाजिक कार्य करीत आहे. दिवाळी सारखा मोठा सण साजरा करताना गरजूंच्या जीवनातही प्रकाशाचा, आशेचा दिवा प्रज्वलित झाला पाहिजे. याच भावनेतून दिवाळी साजरी केली तर उत्सव खऱ्या अर्थाने सर्वांचे जीवन प्रकाशमय करणारा ठरतो.

समाजऋणातून उतराई होण्याच्या उपक्रमामुळे खऱ्या अर्थाने गरजूंना दिलासा मिळत आहे. या कार्यात सहभागी होणे पुण्यकर्म आहे, अशा भावना सुशिल माणिकचंद मुथा यांनी व्यक्त केल्या.

जैन ओसवाल वात्सल्य संस्थेमार्फत दर महिन्याप्रमाणे गरजू कुटुंबांना महिनाभराचा किराणा व अन्नधान्य वाटप सुशिल मुथा व परिवाराच्या शुभहस्ते करण्यात आले. दिवाळीनिमित्त लाभार्थी परिवारांना भाऊबीजेची साडी व मिठाई सुद्धा देण्यात आली. श्रीमती केशरबाई माणिकचंद मुथा (बँकवाला) यांच्या स्मरणार्थ मुथा परिवाराने या उपक्रमासाठी सहकार्य केले. धार्मिक परीक्षा बोर्ड समोरील सचिन अशोक कोठारी यांच्या बंगल्यावर हा कार्यक्रम झाला. याप्रसंगी विजया मुथा, ॲड. अमृत मुथा, प्रज्योत मुथा, समीक्षा मुथा, संस्थेचे अध्यक्ष अजित बोरा, उपाध्यक्ष सुभाष मुथा, खजिनदार सतीष मुथा, सेक्रेटरी विजय गुगळे, सदस्य अजित बोरा (पिंपळगाव), सचिन चोपडा, मूळचंद डागा, विजय गुंदेचा, ईश्वर बोरा, प्रमोद गांधी आदी उपस्थित होते.

या उपक्रमासाठी उद्योजक सौरभ व प्रमिलाबाई बोरा, विजय मुथा (वर्धमान), अशोक (बाबुशेठ) गौतम बोरा (एस.के. ज्वेलर्स), चंद्रकांत आशिषकुमार मुथ्था (वांबोरीवाला) इंडीया केमवाला, तप आराधिका सोनल पारस चोरडिया (एन. सुमतीलाल), संतोष राजेश भंडारी (महावीर कन्सट्रक्शन, टाकळी ढोकेश्वरवाला), योगेश प्रकाश बजाज, (अहिल्यानगर.पुणे), अशोक अभय गांधी (रामलाल लालचंद), अजित विजय बोरा (पिंपळगाव माळवी वाला), संतोष पनालाल बोगावत (सतिश शरद), अजय अतुल बोरा (व्हीआरबी ज्वेलर्स), ॲड. विकी दिलीप मुथा, सतिष विक्रम मुथा (मुथा कलेक्शन), किशोर कुणाल गुगळे, (कीर्ति कलेक्शन) यांनी सहयोग दिला.

सुभाष मुथा म्हणाले, जैन वात्सल्य संस्था निरंतर सेवाभाव ठेवून साधर्मींना मदतीचा हात देत आहे. त्यांच्या जीवनात उमेदीने आणि सन्मानाने जगण्याचे बळ देत आहे. प्रत्येकाने सामाजिक उत्तरदायित्व जपले तर वंचितांना आधार मिळून त्यांचीही प्रगती होऊ शकते. आपली संस्कृती वात्सल्य भाव शिकवणे. तोच वात्सल्य भाव संस्थेच्या कार्यात आहे. सुशील मुथा परिवार सेवाभावी वृत्तीचा आहे. त्यांनी संस्थेच्या कार्यात योगदान देऊन गरजूंची दिवाळी गोड केली आहे.

अजित बोरा यांनी संस्थेची माहीती देताना सांगितले, संस्थेच्या माध्यमातून मानव सेवेचे व्रत जोपासत जोपासले जात आहे. संस्था ही अत्यंत चिकाटीने सहधर्मीयांना महिनाभर पुरेल इतके अन्नधान्य वाटप करत आहे . समाजातील दुर्बल घटकांच्या उन्नतीसाठी संस्था अविरत कार्य करीत आहे. या समाज कार्यात अनेक दानशूर व्यक्तींचा हातभार लागत आहे. त्यामुळे हे कार्य अखंडपणे चालू ठेवण्यासाठी प्रोत्साहन मिळते. विजय गुगळे यांनी आभार मानले

ज्येष्ठ छायाचित्रकार राजू शेख यांचा 'रेडिओ नगर'वर विशेष संवाद

कॅमेऱ्याच्या लेन्समधून उलगडला वृत्तछायाचित्रकारितेचा प्रवास । जुन्या आठवणी, पत्रकारितेतील अनुभव आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या प्रवासावर साधला मनमोकळा संवाद

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– पत्रकारिता क्षेत्रात वृत्तपत्र छायाचित्रकाराचे योगदान अत्यंत महत्त्वाचे असते. एखादी घटना शब्दांत मांडण्यापूर्वी ती आपल्या कॅमेऱ्यातून जिवंत करणारा छायाचित्रकार हा पत्रकारितेचा एक महत्त्वाचा आधारस्तंभ असतो. अशाच छायाचित्रणाच्या माध्यमातून अनेक वर्षे पत्रकारितेची सेवा करणारे जुन्या पिढीतील ज्येष्ठ वृत्तपत्र छायाचित्रकार राजू शेख यांच्याशी 'रेडिओ नगर ९०.४ एफएम'च्या विशेष मुलाखतीत मनमोकळा संवाद साधण्यात आला आहे. हा कार्यक्रम शुक्रवार, ६ नोव्हेंबर २०२६ रोजी रात्री ९ वाजता 'रेडिओ नगर ९०.४ एफएम'वर प्रसारित होणार आहे.



'लोकशाहीचा चौथा स्तंभ : प्रेस फोटोग्राफर' या विशेष मुलाखतीच्या माध्यमातून राजू शेख यांनी आपल्या प्रदीर्घ जीवनप्रवासातील अनेक अनुभवांना उजाळा दिला. त्यांची मुलाखत ज्येष्ठ पत्रकार अजय धोपावकर यांनी घेऊन त्यांना विविध विषयांवर बोलते केले. वृत्तपत्र छायाचित्रणाची सुरुवात, त्या काळातील आव्हाने, बातमीसाठी घटनास्थळी पोहोचण्याची धडपड, योग्य क्षण टिपण्यासाठी घ्यावी लागणारी मेहनत आणि छायाचित्रकार म्हणून घडत गेलेला प्रवास अशा विविध विषयांवर त्यांनी आपले अनुभव मांडले.

एकेकाळी फिल्म रोल, निगेटिव्ह, डार्करूम आणि छायाचित्र विकसित करण्याच्या प्रक्रियेतून वृत्तपत्र छायाचित्रणाचा प्रवास सुरू होता. एका महत्त्वाच्या क्षणाचे छायाचित्र टिपण्यासाठी छायाचित्रकाराला प्रचंड संयम, निरीक्षणशक्ती आणि प्रसंगावधान राखावे लागत असे. आजच्या डिजिटल युगात मोबाईल, डिजिटल कॅमेरे, आधुनिक लेन्स आणि अत्याधुनिक तंत्रज्ञानामुळे छायाचित्रणाचे स्वरूप पूर्णपणे बदलले आहे. या बदलत्या छायाचित्रकलेचा प्रवास आणि जुन्या काळातील अनुभव यांची सांगड घालत राजू शेख यांनी आपले विचार व्यक्त केले.

काळ बदलला, तंत्रज्ञान बदलले, छायाचित्रणाची साधने बदलली; मात्र बातमीचा अचूक क्षण टिपण्याची दृष्टी, सामाजिक भान आणि छायाचित्रातून वास्तव मांडण्याची जबाबदारी आजही तितकीच महत्त्वाची आहे, या विषयावर त्यांनी संवाद साधला आहे. नव्या पिढीतील छायाचित्रकार आणि पत्रकारांसाठी हा संवाद निश्चितच प्रेरणादायी ठरणार आहे. जुन्या पिढीने अनुभवलेल्या पत्रकारितेच्या आठवणी आणि नव्या पिढीसमोर उभे असलेले आधुनिक तंत्रज्ञानाचे विश्व यांच्यातील दुवा साधणारी ही मुलाखत ठरणार आहे. ऑनलाइन रेडिओची मुलाखत एकण्यासाठी https://centova87.shoutcastservices.com/proxy/nagar90/stream ही लिंक उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

रोटरी क्लब ऑफ अहिल्यानगर सेंट्रल व रोटरी क्लब ऑफ मुलुंड हिल्स, मुंबई यांचा स्नेहालयमध्ये संयुक्त प्रकल्प



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– रोटरी क्लब ऑफ अहिल्यानगर सेंट्रल, रोटरी इंटरनॅशनल डिस्ट्रिक्ट ३१३२ व रोटरी क्लब ऑफ मुलुंड हिल्स, मुंबई रोटरी इंटरनॅशनल डिस्ट्रिक्ट ३१४१ यांच्या संयुक्त विद्यमाने स्नेहालय एमआयडीसी अहिल्यानगर येथील कौशल्य विकास केंद्रा साठी लागणाऱ्या मशिनरी साठी रोटरी क्लब ऑफ अहिल्यानगर सेंट्रल च्यावतीने ५०,०००/- व रोटरी क्लब ऑफ मुलुंड हिल्स यांच्या वतीने १,००,०००/-असे एकूण दीड लाखाचे डोनेशन प्रधान करण्यात आले. या आर्थिक निधी मुळे स्नेहालय मधील कौशल्य विकास केंद्रा मध्ये शिकत असलेल्या विध्यार्थ्यांना रोजगार मिळण्यास निश्चित उपयोग व मदत होणार आहे.

यावेळी स्नेहालय इंग्रजी शाळे मध्ये शिकत असलेल्या ६०० विध्यार्थी व शाळेचा वाढत असलेल्या दर्जा मुळे विध्यार्थी संख्या वाढत आहे. व त्यामुळे वर्ग कमी पडत असल्याने इमारतीचे एक्स्टेंशन करण्यासाठी दुसऱ्या व तिसऱ्या मजल्याच्या बांधकामचे शुभारंभ रोटरी सेंट्रलचे अध्यक्ष अमर गुरप व मुलुंड हिल्स अध्यक्ष विनोद चौबे व दोन्ही क्लब च्या सदस्यांच्या उपस्थित करण्यात आले. स्नेहालय संस्थेने शालेय शिक्षणासोबत विविध एक रोजगाराभिमुख कौशल्यचे प्रशिक्षण देऊन शैक्षणिक क्षेत्रासमोर प्रेरणादायी आदर्श निर्माण केला आहे असे प्रतिपादन दोन्ही क्लबच्या अध्यक्षयांनी केले.

या दोन्ही क्लबच्या सहकार्याने स्नेहालयाच्या कौशल्य विकास केंद्राला अधिक सक्षम करण्यासाठी तयार करण्यात आलेल्या योजनेचाही प्रारंभ करण्यात आला. यावेळी दोन्ही क्लबच्या सदस्यांनी स्नेहालयाच्या विविध सामाजिक व पुनर्वसन प्रकल्पना भेट देऊन संस्थेच्या कार्याची माहित्ती घेतली. या मध्ये स्नेहांकुर दत्तक विधान सेंटर, मानसिक आरोग्यासाठी असणाऱ्या मानसग्राम, अनाथ तसेच एचआयव्ही/ एड्स बाधितांच्या पुनर्वस्नासाठीचे संकुल, इंग्रजी माध्यम शाळा व विविध कौशल्य विकास केंद्राचा समावेश होता. यावेळी अहिल्यानगर सेंट्रलचे अध्यक्ष रो. अमर गुरप, सचिव सुनील मुथा, पीडीजी शिरीष रायते,डॉ.कुणाल कोल्हे,हरीश नय्यर,मनीष बोरा,चेतन अमरापूरकर, उमेश रेखे,हितेश गुप्ता,राजीव गुजर,दत्ता दीक्षित, सुनील कटारिया, प्रभाकर बोगा, तसेच मुलुंड हिल्स क्लबचे रो.विनोद चौबे, सीए के व्ही नटराजन,नारायण शर्मा,डॉ.अनुप गुप्ता,सीए सतीश सोनी,चंदेरकांत सूरी,डॉ.परेश ठक्कर,कैलाश सटाणेकर,राजेंद्र शाह,रजनीकांत पारीख,अजय पारीख, स्नेहालयाचे संस्थापक गिरीश मुळे,संस्थेचे संचालक,शाळेचे मुख्याध्यापक शीतल गुंदेचा सर्व पदाधिकारी, कर्मचारी, विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्र संचालन शीतल गुंदेचा यांनी केले. तर आभार प्रदर्शन कौशल्य विकास केंद्राचे संचालक मिलिंद भद्रे यांनी मानले.

महसूल कर्मचाऱ्यांच्या कथित त्रासाला कंटाळून शेतकऱ्याचे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण

जमीन व्यवहारात पाच लाखांची मागणी, दमदाटी व फॉरेस्ट वर्ग-२ जमिनीच्या बेकायदा खरेदीचे गंभीर आरोप



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– जमीन व्यवहारातील कथित फसवणूक, लाचखोरी तसेच महसूल विभागातील कर्मचाऱ्यांकडून होत असलेल्या त्रासाला कंटाळून पाथर्डी तालुक्यातील कुत्तरवाडी येथील शेतकरी अंबादास दादाबा गायकवाड यांनी इतर १५ व्यक्तींसह जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू केले आहे. आपल्या विविध मागण्यांवर तातडीने कारवाई करावी, अशी मागणी त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

या उपोषणात शेतकरी अंबादास दादाबा गायकवाड यांच्यासह वसंत खेडकर, बाबुराव खेडकर, केशव खेडकर, विष्णू खेडकर, देविदास खेडकर आदींसह कुटुंबातील महिला शेतकरी मोठ्या संख्येने सहभागी झाल्या आहेत.

निवेदनात नमूद केल्यानुसार, कुत्तरवाडी येथील जुना सर्व्हे क्रमांक २२६ आणि नवीन सर्व्हे क्रमांक ६६/१/अ/१ मधील जमिनीवर अर्जदार गेल्या ५५ वर्षांपासून वहीत करीत आहेत. सदर जमीन अर्जदारांना देण्याबाबत तहसीलदार आणि प्रांताधिकाऱ्यांनी लेखी आदेश दिले असल्याचा दावा करण्यात आला आहे. मात्र, महसूल विभागातील क्लार्क भगवान सानप यांनी जमीन देण्यासाठी पाच लाख रुपयांची मागणी केल्याचा गंभीर आरोप निवेदनात करण्यात आला आहे. तसेच विश्वेश्वर खेडकर यांनी अन्य व्यक्तींना सोबत घेऊन दमदाटी केल्याचेही अर्जदारांनी म्हटले आहे.

याशिवाय, रस्त्यात अडवून अपमानास्पद तसेच जातिवाचक शब्दांचा वापर करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. या घटनांमुळे झालेल्या मानसिक त्रासातून पत्नीला तीव्र मानसिक धक्का बसला आणि त्यानंतर हृदयविकाराच्या झटक्याने तिचा मृत्यू झाल्याचा दुर्दैवी दावा अंबादास गायकवाड यांनी निवेदनात केला आहे.

फॉरेस्ट वर्ग-२ जमिनीच्या खरेदीचा मुद्दाही ऐरणीवर

कुत्तरवाडी शिवारातील दलित व मातंग समाजातील नागरिकांना मिळालेल्या फॉरेस्ट वर्ग-२ जमिनींच्या खरेदी-विक्रीचा मुद्दाही निवेदनात उपस्थित करण्यात आला आहे. गट क्रमांक ६६/१/अ/३, ८५५/१ आणि ८५५/२ मधील जमिनींची नियमांचे उल्लंघन करून खरेदी करण्यात आल्याचा आरोप करत संबंधित खरेदी व्यवहार रद्द करण्याची मागणी करण्यात आली आहे. यासंदर्भात मंडळ अधिकारी आणि तहसीलदार यांनी अहवाल पाठविला असल्याचे सांगण्यात आले; मात्र अद्याप ठोस कारवाई झालेली नसल्याची तक्रार अर्जदारांनी केली आहे.

संबंधित जमीन व्यवहारांची निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कारवाई करावी, कथित लाचखोरी व दमदाटीच्या आरोपांची सखोल तपासणी करावी आणि फॉरेस्ट वर्ग-२ जमिनीच्या व्यवहारांबाबत योग्य तो निर्णय घ्यावा, अशा मागण्या उपोषणकर्त्यांनी केल्या आहेत.

प्रशासनाने या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन तातडीने न्याय द्यावा, अन्यथा आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशाराही उपोषणकर्त्यांनी दिला आहे.

अहिल्यानगर आरटीओ कार्यालयातील कारभाराविरोधात वंचित बहुजन आघाडी आक्रमक

दलालशाही, रोख वसुली व धोकादायक जुगाडू वाहतुकीवर कडक कारवाईची मागणी

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– अहिल्यानगर प्रादेशिक परिवहन कार्यालयात सुरू असलेला अनागोंदी कारभार, अनधिकृत एजेंटशाही, चेक पॉईंटवरील बेकायदेशीर वसुली आणि रस्त्यावरील धोकादायक 'जुगाडू' व ओव्हरलोड ऊस वाहतुकीविरोधात वंचित बहुजन आघाडीच्या वतीने प्रादेशिक परिवहन अधिकारी सगरे यांना निवेदन देताना वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष योगेश साठे समवेत वाहतूक विभागाचे मनोज साळवे, युवा शहराध्यक्ष ॲड. योगेश गुंजाळ, गौतम निळ, मनोज साळवे, पप्पू चव्हाण, संदीप साळवे, सुरेश पानपाटील आधीसह पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

निवेदनात म्हटले आहे की, आरटीओ कार्यालयात कामासाठी येणाऱ्या नागरिकांना थेट सेवा मिळण्याऐवजी अनधिकृत मध्यस्थ व दलालांच्या माध्यमातून जाण्याची सक्ती केली जात असून, यामुळे सर्वसामान्यांची आर्थिक पिळवणूक होत आहे



तसेच शासनाचे परिपत्रक असतानाही अधिकारी व कर्मचारी मुख्यालयात वेळेवर उपस्थित राहत नसल्याने नागरिकांना ताटकळत राहावे लागते. तसेच रस्ते तपासणी पथकांकडून चेकिंगच्या नावाखाली चेक पॉईंट्सवर वाहने अडवून बेकायदेशीररीत्या रोख वसुली केली जात असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. जिल्ह्यात कोणतीही सुरक्षा मानके न पाळता आणि अधिकृत पार्सिंग किंवा आरटीओ मान्यता नसताना सर्रास चालणारी बेकायदेशीर 'जुगाडू' आणि क्षमतेपेक्षा जास्त (ओव्हरलोड) ऊस वाहतूक अत्यंत चिंताजनक बनली आहे. यामुळे गंभीर अपघात होऊन निष्पाप नागरिकांचा जीव धोक्यात येत असूनही आरटीओ प्रशासनाकडून याकडे दुर्लक्ष केले जात आहे.

आरटीओ कार्यालयातील सर्व प्रकारची एजेंटशाही व दलाल यंत्रणा तात्काळ समूळ नष्ट करावी आणि सर्वसामान्यांची कामे शासकीय दरामध्ये व ठरलेल्या वेळेत थेट खिडकीवर पूर्ण होतील अशी व्यवस्था उभी करावी.

रस्ते तपासणीच्या नावाखाली चेक पॉईंट्सवर चालणारी बेकायदेशीर रोख वसुली पूर्णपणे बंद करून सर्व कारभार पारदर्शक व डिजिटल करावा.

अधिकारी व कर्मचाऱ्यांना मुख्यालयात उपस्थित राहणे बंधनकारक करून कार्यालयीन वेळेचा फज्जा उडवणाऱ्या कर्मचाऱ्यांवर प्रशासकीय कारवाई करावी. विनापरवाना व धोकादायक पद्धतीने चालणारी सर्व बेकायदेशीर जुगाडू ऊस वाहतूक तसेच ओव्हरलोड वाहतूक करणाऱ्या वाहनांवर तात्काळ दंडात्मक व कायदेशीर कारवाई करून ती वाहने जप्त करण्यात यावी तसेच प्रशासनाने या मागण्यांवर गांभीर्याने विचार करून कायदेशीर सुधारणात्मक पावले न उचलल्यास, वंचित बहुजन आघाडीतर्फे लोकशाही व सनदशीर मार्गाने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही या निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.

गोशाळांतील पशुधनाच्या चारा-पाण्यासाठी प्रतिदिन १०० रुपये अनुदान द्या!

दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर गोशाळा महासंघ आक्रमक; जिल्हाधिकाऱ्यांमार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– राज्यातील दुष्काळी परिस्थितीमुळे गोशाळांमधील पशुधनाच्या चारा आणि पाण्याचा प्रश्न गंभीर बनत चालला असून, शासनाने प्रत्येक पशुसाठी प्रतिदिन १०० रुपये अनुदान तातडीने मंजूर करावे, अशी मागणी गोशाळा महासंघाच्या वतीने करण्यात आली आहे. यासंदर्भात जिल्ह्यातील गोशाळा संचालक आणि पशुपालकांनी जिल्हाधिकाऱ्यांमार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन दिले आहे. राज्यातील शासनाकडे नोंदणीकृत असलेल्या १ हजार १४ गोशाळांमधील सर्व पशुधनासाठी चारा व पाण्याच्या व्यवस्थेकरिता सरसकट अनुदान देण्याची मागणी या निवेदनातून करण्यात आली आहे.

राज्यात पावसाचे प्रमाण कमी राहिल्याने ग्रामीण भागातील पशुधनासमोर चाऱ्याचा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. शेतांमध्ये हिरवा चारा, कडबा आणि कुटार उपलब्ध होत नसून पडीत जमिनी, डोंगराळ भाग तसेच जंगल परिसरातही अपेक्षित चारा उगवलेला नाही. परिणामी उपलब्ध चाऱ्याचे दर मोठ्या प्रमाणात वाढले आहेत. दुसरीकडे शासनाकडेही पशुधनासाठी पुरेसा चारा साठा उपलब्ध नसल्याने आगामी काळात परिस्थिती आणखी गंभीर होण्याची शक्यता आहे. केवळ चाऱ्याचाच नव्हे, तर पिण्याच्या पाण्याचाही प्रश्न बिकट होत आहे. विहिरी, बोअरवेल, तलाव आणि धरणांमधील पाणीसाठा कमी होत असल्याने भविष्यात गोशाळांना टँकरद्वारे पाणी उपलब्ध करून देण्याची वेळ येऊ शकते. त्यामुळे चारा आणि पाण्याचे नियोजन आतापासूनच करणे आवश्यक असल्याचे महासंघाने निवेदनात नमूद केले आहे.



गोशाळांवर क्षमतेपेक्षा अधिक पशुधनाचा भार

दुष्काळी परिस्थितीमुळे अनेक शेतकऱ्यांना स्वतःचा उदरनिर्वाह करणेही कठीण झाले आहे. अशा परिस्थितीत शेतकरी आपल्याकडील पशुधन गोशाळांमध्ये आणून देत आहेत. गोशाळा संचालकही सामाजिक बांधिलकीतून या पशुधनाचा स्वीकार करीत आहेत. मात्र, त्यामुळे अनेक गोशाळांमध्ये त्यांच्या निर्धारित क्षमतेपेक्षा अधिक गोवंश जमा झाला आहे. उपलब्ध मनुष्यबळ, आर्थिक साधने आणि चारा-पाण्याच्या मर्यादित व्यवस्थेत एवढ्या मोठ्या पशुधनाचे संगोपन करणे गोशाळा संचालकांसाठी आव्हानात्मक बनले आहे. त्यामुळे शासनाने प्रत्येक गोशाळेतील पशुधनाची प्रत्यक्ष संख्या विचारात घेऊन अनुदान उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी करण्यात आली आहे.

गोवंश कत्तलीकडे जाण्याची भीती; चारा डेपो उभारण्याची मागणी

दुष्काळामुळे आर्थिक अडचणीत सापडलेले काही शेतकरी नाइलाजाने आपल्याकडील पशुधन विक्री करीत आहेत. अशा पशुधनाची खरेदी करणारे शेतकरी नसल्याने मोठ्या प्रमाणात गोवंश कत्तलीसाठी जाण्याची भीती व्यक्त करण्यात आली आहे. महाराष्ट्रात गोवंश हत्याबंदीचा कायदा लागू असून शासनाने गोमातेला राज्य मातेचा दर्जाही दिला आहे. अशा परिस्थितीत गोवंशाचे संरक्षण करणे ही शासनाची जबाबदारी आहे. कत्तलीसाठी जाणाऱ्या गोवंशाची वाहतूक गोरक्षकांनी पकडल्यास कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे गोवंशाचे संरक्षण करण्यासाठी शासनाने ठोस उपाययोजना कराव्यात, असेही निवेदनात म्हटले आहे.

याशिवाय ग्रामीण भागातील पशुपालकांना दिलासा देण्यासाठी प्रत्येक गावात ग्रामपंचायत स्तरावर चारा डेपो सुरू करावेत. चाऱ्याची उपलब्धता, साठवणूक आणि वितरण यासाठी स्वतंत्र यंत्रणा उभारावी. तसेच गोशाळांमधील पशुधनाच्या संख्येनुसार प्रतिदिन प्रतिपशू १०० रुपये याप्रमाणे चारा व पाण्यासाठी अनुदान तातडीने जाहीर करून त्याचे सरसकट वितरण करावे, अशी आग्रही मागणी महासंघाने केली आहे.दुष्काळी परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन शासनाने या मागण्यांवर तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यापर्यंत हे निवेदन पोहोचवून आवश्यक आदेश निर्गमित करावेत, असे आवाहन गोशाळा महासंघाने केले आहे.या वेळी गोशाळा महासंघाचे अध्यक्ष ललित चोरडिया, सचिव गौतम कराळे, उपाध्यक्ष ह.भ.प. रवींद्रनाथ महाराज, सुद्रिक मंगेश भापकर, हिंदुराष्ट्र सेनेचे जिल्हाध्यक्ष संजय अडोळे, अनिल जोशी, प्रमिताताई ढगे, नामदेव कराळे, मुनोत आदीं उपस्थित होते.

विधानपरिषदेचे उपसभापती सचिन आहेर यांना खताडे यांनी दिले विविध मागण्यांचे निवेदन

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



अहिल्यानगर– अहिल्यानगर येथील गवळी समाजाचे राज्य कार्यकारणी सदस्य बाळासाहेब महादू खताडे यांनी मुबंई येथे राज्याचे विधानपरिषदेचे उपसभापती सचिन आहेर यांची भेट घेऊन त्यांना विविध मागण्याचे निवेदन सादर करून त्यांच्याशी चर्चा केली त्यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे कि

अहिल्यानगर गवळी समाजाने सन १९३१ सि.स.नं. ६९३१ स्मशानभुमीसाठी खरेदी केलेल्या मालकी हक्काच्या जागेवरील अतिक्रमण झोपडपट्टी काढणे बाबत..

अहिल्यानगर गवळी समाजाच्या स्मशानभूमीच्या जागेवर काही अधिका-यांच्या संगनमताने एका व्यक्तीने वैयक्तिक नाव लावले आहे. त्याची सखोल चौकशी करुन त्या व्यक्तीवर सदर अधिका-यावर योग्य ती कारवाई करुन अ.नगर मधील गवळी समाजाला न्याय मिळवुन दयावा

अ.नगर गवळी समाजाचे अ.नगर व बीड जिल्हयाच्या बॉन्ड्रीवर श्रध्येचे पुरातन मंदिर ब्रम्हसिध्देश्वर सावरगांव, सि. सर्व्हे नं. १३४९ हा क्रमाक मुंतखाब फसलिष्य १३४९ नं. ४. (सावरगांव घाट) या ठिकाणी जाण्यासाठी रस्ता जिर्णोध्दासाठी निधी उपलब्ध करून देण्यात यावा ही विनंती. या मंदिरात महिन्याच्या प्रत्येक अमावस्येला अहिल्यानगर मधून भंडा-याचे नियोजण केले जाते व दर वर्षी श्रावण महिन्यातील तिस-या सोमवारी मोठ्या प्रमाणात भंडा-याचे नियोजन केले जाते. त्याठिकाणी मोठी यात्रा भरते. त्या यात्रेसाठी तीन राज्यातून महाराट्र, कर्नाटक, व गोवा इ. ठिकाणाहुन गवळी समाजाचे जवळपास २५/३० हजार भाविक लोक येतात. यासाठी आपण राज्यसरकारच्या माध्यमातुन निधी उपलब्ध करून दयावा ही नम्र विंनती.

दुष्काळामध्ये ग्रामीण भागात ज्या पध्दतीने जणावरांसाठी राज्यसरकारकडुन छावणीचे नियोजन करण्यात येते. त्या पध्दतीने शहरी भागात सुध्दा छावणी किंवा चारा डेपोची व्यवस्था करण्यात यावी. त्यामुळे कष्टकरी गवळी समाजाला त्याचा लाभ मिळेल.असे त्यांनी म्हंटले आहे

प्रभाग क्रमांक १३ मध्ये विकासकामांचा धडाका; काँक्रीट रस्त्यांच्या कामाला सुरुवात

आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते ऍडव्हेंटिस चर्च ते हेमराज बोरा केटरर्स रस्त्याच्या कामाचा शुभारंभ



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– शहरातील वाढती लोकसंख्या, वाहतुकीचा वाढता ताण आणि नागरिकांच्या मूलभूत सुविधांची गरज लक्षात घेऊन अहिल्यानगर शहरात पायाभूत सुविधांच्या विकासाला गती दिली जात आहे. याच अनुषंगाने प्रभाग क्रमांक १३ मधील ऍडव्हेंटिस चर्च ते हेमराज बोरा केटरर्सपर्यंतच्या रस्त्याच्या काँक्रीटीकरण कामाचा शुभारंभ आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते करण्यात आला. नगरसेवक अविनाश घुले,सुरेश बनसोडे ,अनिता शेटिया ,सुजाता पडोळे यांच्या विशेष प्रयत्नातून हे काम मार्गी लागले आहे. या रस्त्याच्या काँक्रीटीकरणामुळे परिसरातील नागरिकांची अनेक वर्षांपासूनची रस्त्याची समस्या दूर होण्यास मदत होणार असून, दळणवळण अधिक सुलभ आणि सुरक्षित होणार आहे. प्रभागातील रस्त्यांचा दर्जा सुधारण्याबरोबरच परिसराच्या एकूण विकासाच्या दृष्टीने हे काम महत्त्वपूर्ण मानले जात आहे.

यावेळी आमदार संग्राम जगताप म्हणाले की, अहिल्यानगर शहराचा सर्वांगीण आणि नियोजनबद्ध विकास करण्यासाठी विविध भागांमध्ये पायाभूत सुविधांची कामे हाती घेण्यात येत आहेत. शहराचा विस्तार वेगाने होत असून, भविष्यातील गरजा लक्षात घेऊन विकासकामांचे नियोजन करणे आवश्यक आहे. मुंबईच्या धर्तीवर अहिल्यानगर शहरात काँक्रीट रस्त्यांचे जाळे निर्माण करण्याचा मानस आहे. काँक्रीट रस्त्यांमुळे रस्त्यांची टिकाऊ क्षमता वाढण्यासह नागरिकांना चांगल्या दर्जाचा प्रवास अनुभवता येईल. शहरातील प्रत्येक भागाला विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. अहिल्यानगर शहर हे एक विकसित आणि आधुनिक शहर म्हणून ओळखले जावे, यासाठी सर्वांनी एकत्रितपणे काम करण्याची आवश्यकता आहे. नगरसेवकांच्या सहकार्याने शहरातील विकासकामांना गती मिळत असून, नागरिकांना आवश्यक असलेल्या सुविधा उपलब्ध करून देण्यास प्राधान्य दिले जात असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी नगरसेवक अविनाश घुले म्हणाले की, प्रभाग क्रमांक १३ मधील नागरिकांना दर्जेदार आणि कायमस्वरूपी मूलभूत सुविधा उपलब्ध करून देणे हे आपले प्रमुख उद्दिष्ट आहे. प्रभागातील रस्ते, पाणीपुरवठा, स्वच्छता तसेच अन्य नागरी सुविधांबाबत नागरिकांकडून सातत्याने मांडण्यात येणाऱ्या प्रश्नांचा पाठपुरावा केला जात आहे. ऍडव्हेंटिस चर्च ते हेमराज बोरा केटरर्स या रस्त्याची आवश्यकता लक्षात घेऊन या कामासाठी प्रयत्न करण्यात आले. नागरिकांना दररोज ये-जा करताना अडचणींचा सामना करावा लागू नये, वाहतुकीचा प्रश्न सुटावा आणि परिसरातील दळणवळण अधिक चांगले व्हावे, या उद्देशाने या रस्त्याचे काँक्रीटीकरण करण्यात येत आहे. केवळ रस्त्यांची कामे करणे एवढाच मर्यादित उद्देश नसून, प्रभागातील नागरिकांचे जीवनमान उंचावण्यासाठी आवश्यक असलेल्या सर्व सुविधांचा विकास करण्याचा आपला प्रयत्न असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

नगरसेवक सुरेश बनसोडे म्हणाले की, आमदार संग्राम जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली आणि सहकार्याने प्रभागातील विकासकामांसाठी सातत्याने पाठपुरावा केला जात आहे. लोकप्रतिनिधी म्हणून नागरिकांनी दाखविलेला विश्वास सार्थ ठरविणे ही आपली जबाबदारी आहे. नागरिकांच्या अडचणी समजून घेऊन त्या सोडविण्यासाठी प्रशासन आणि संबंधित यंत्रणांकडे नियमित पाठपुरावा केला जात आहे.

दिवाळी अंकातून मिळणारी आनंदाची दिवाळी चिरकाळ टिकणारी– डॉक्टर राजा ठाकूर

जिल्हा वाचनालयात दिवाळी वाचकांसाठी 'मेजवानी'

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



अहिल्यानगर– बदलत्या जीवनशैलीत दीपावलीच्या साजरा करण्याच्या पद्धती ही बदलत चालल्या आहेत. दीपावलीच्या या काळात घेतलेले नवीन वस्तू ,बनवलेल्या फराळ ,केलेली फटाक्यांची आतशबाजी यांचा आनंद अल्पावधीत कमी होईल .परंतु आपल्याला दैदिप्यमान परंपरा असलेल्या मराठी दिवाळी अंकाच्या वाचनातून मिळणारे विचार, ज्ञान ,आनंद हा खऱ्या अर्थाने चिरकाल टिकणारा असल्याचे प्रतिपादन जिल्हा वाचनालयाचे अध्यक्ष डॉ. राजा ठाकूर यांनी व्यक्त केले .अहिल्यानगर जिल्हा वाचनालयात दीपावली निमित्ताने रसिक नगरकर वाचकांसाठी उपलब्ध केलेल्या दिवाळी अंकांचे वाचकांना वितरण सोहळ्या प्रसंगी ते बोलत होते. यावेळी वाचनालयाचे प्रमुख कार्यवाह विक्रम राठोड, सहकार्यवाह राहुल तांबोळी, उपाध्यक्ष दिलीप पांढरे, संचालक प्रा. ज्योती कुलकर्णी, किरण आगरवाल, जिल्हा ग्रंथालयाचे अधिकारी संतोष कापसे, उद्योजक ओंकार व सौ आणि देशमुख ,यश तांदूळवाडकर, ग्लोबल इन्फोटेक चे अशोक दानी ,अभिजीत भळगट ,ग्रंथपाल अमोल इथापे, सहाय्यक ग्रंथपाल नितीन भारताल, कवी चंद्रकांत पालवे, अनिल झंवर,अविनाश रसाळ, मकरंद राजहंस, विठ्ठल पाठक, पल्लवी कुक्कडवाल सौ.वर्षा जोशी, संजय गाडेकर राजेंद्र साळी,श्री. शंतनु साळी उपस्थित होते.यावेळी प्रमुख कार्यवाह विक्रम राठोड यांनी उपस्थित मान्यवरांचा सन्मान करून दिवाळी अंकांचे वितरण केले.

प्रास्ताविकात संचालिका प्राध्यापिका ज्योती कुलकर्णी यांनी वाचनालयात वाचकांसाठी त्यांच्या आवडीप्रमाणे विविध वृत्तपत्रांचे दिवाळी अंक तसेच विनोदी, धार्मिक, क्रीडा ,भविष्य, विज्ञान, कथा ,पाककला, अध्यात्मिक बालवाचकांसाठी दिवाळी अंक असे असंख्य विषयावर दिवाळी अंक उपलब्ध करण्यात आले त्याचा रसिक नगरकरांनी लाभ घ्यावा असे आवाहन केले.

उद्योजक ओंकार देशमुख यांनी या उपक्रमाबद्दल जिल्हा वाचनालया विषयी कृतज्ञता व्यक्त करत दिवाळी अंकांच्या माध्यमातून खऱ्या अर्थाने विचारांची तेजोमय दिवाळी साजरी होणार असल्याचे सांगितले या प्रसंगी विविध क्षेत्रातील उद्योजक व्यावसायिक रसिक वाचक सभासद उपस्थित होते आभार सहकार्यवाह राहुल तांबोळी यांनी मांडले.

शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील डॉक्टर व कर्मचाऱ्यांचा स्नेहबंधतर्फे सन्मान

डॉ. उद्धव शिंदे यांच्या हस्ते पुस्तक व गुलाबपुष्प देऊन गौरव; अहिल्यानगरकरांचे अनेक वर्षांचे स्वप्न साकार



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– अहिल्यानगर शहरात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय सुरू झाल्याबद्दल आनंद व्यक्त करत स्नेहबंध सोशल फौंडेशनच्या वतीने महाविद्यालयातील अधिष्ठाता, डॉक्टर व कर्मचाऱ्यांचा पुस्तक आणि गुलाबपुष्प देऊन सन्मान करण्यात आला. फौंडेशनचे संस्थापक अध्यक्ष डॉ. उद्धव शिंदे यांच्या हस्ते हा सन्मान करण्यात आला.

यावेळी महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. अविनाश लांब (प्राध्यापक), डॉ. राजेंद्र अंकुशे, डॉ. गणेश घुगे, डॉ. श्रीकांत रोकडे, डॉ. विष्णू कंकुटे, डॉ. प्रशांत दहिरे, डॉ. स्नेहलता येळंबकर, डॉ. सारिका अरगडे, डॉ. मनोहर शेळके, डॉ. ज्योती उगलमुगले, डॉ. आरती तांबे, डॉ. साक्षी मेहता, प्रतीक्षा सोळंके आणि प्रशासकीय अधिकारी नंदकुमार कोकरे, डॉ. दीपक बनसोडे (प्राध्यापक, शरीरक्रियाशास्त्र विभाग), डॉ. गणेश नितूरकर (प्राध्यापक, न्यायवैद्यकशास्त्र विभाग), डॉ. निखिल गोडे (सहयोगी प्राध्यापक) यांचा पुस्तक व गुलाबपुष्प देऊन गौरव करण्यात आला.

यावेळी डॉ. उद्धव शिंदे म्हणाले की, अहिल्यानगर शहरात शासकीय वैद्यकीय महाविद्यालय सुरू व्हावे, ही अनेक दिवसांपासूनची मनापासून इच्छा होती. आता हे महाविद्यालय सुरू झाल्यामुळे अहिल्यानगरकरांचे अनेक वर्षांचे स्वप्न साकार झाले असून संपूर्ण शहरवासीयांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. शासकीय वैद्यकीय महाविद्यालयामुळे परिसरातील विद्यार्थ्यांना वैद्यकीय शिक्षणाच्या नव्या संधी उपलब्ध होतील, तसेच सर्वसामान्य नागरिकांना आरोग्यसेवेच्या दृष्टीने मोठा आधार मिळेल, अशी अपेक्षा आहे.

डॉक्टर आणि वैद्यकीय क्षेत्रातील कर्मचारी हे रुग्णसेवेच्या माध्यमातून समाजाचे आरोग्य जपण्याचे महत्त्वपूर्ण कार्य करतात. त्यांच्या कार्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी आणि नव्याने सुरू झालेल्या या वैद्यकीय महाविद्यालयाच्या वाटचालीस शुभेच्छा देण्यासाठी हा छोटासा सन्मान सोहळा आयोजित केल्याचे डॉ. शिंदे यांनी सांगितले.

सामाजिक बांधिलकी जपत समाजातील विविध घटकांचा सन्मान करणे आणि चांगल्या कार्याला प्रोत्साहन देणे, हा स्नेहबंध सोशल फौंडेशनचा नेहमीच प्रयत्न असल्याचेही त्यांनी नमूद केले.

फटाके न फोडता गरजूंना मदत करण्याचा विद्यार्थ्यांचा संकल्प

प. पू. आनंदऋषी अंध, अपंग विद्यालयात ब्ल्यू डायमंड स्कूलमधील विद्यार्थ्यांची दिपावली साजरी



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– वडगाव गुप्ता येथील ब्ल्यू डायमंड स्कूलमध्ये प्रत्येक वर्षी राबविल्या जाणाऱ्या नवनवीन उपक्रमासोबत विद्यार्थ्यांमध्ये सहानुभूती, प्रेम, परिस्थितीची जाणीव या मूल्यांची रूजवणूक करण्यासाठी याही वर्षी इ.९ वी चे विद्यार्थी व शिक्षक यांनी स्कूलचे प्राचार्य व उपप्राचार्य यांच्या मार्गदर्शनाखाली आनंदऋषी अपंग विद्यालयास भेट देऊन तेथील अपंग विद्यार्थ्यांसोबत दीपावली साजरी केली.

विद्यार्थ्यांनी अपंग गरजू विद्यार्थ्यासाठी मिठाई, दिवाळी फराळ, बिस्किटे, दैनदिन उपयोगी वस्तू , किराणा, तसेच मुलीसाठी ज्वेलरी, मेहंदी कोन अशा वस्तू आणल्या होत्या. या सर्व वस्तू अपंग गरजू विद्यार्थ्यांना दिल्यानंतर तेथील मुलांच्या चेहऱ्यावरील आनंद पाहून विद्यार्थ्यांचा आनंद द्विगुणित झाला .

अपंग मुलांची परिस्थिती पाहून उपस्थित सर्वच विद्यार्थ्यांची मने भरवून गेली. आपल्याजवळ जे आहे, त्याबद्दल काही तक्रार न करता आपण समाधान मानावे, असे विचार विद्यार्थ्यांनी व्यक्त केले. सोबतच आपण स्वतः दिवाळीमध्ये फटाके न फोडता प्रदूषणमुक्त दीपावली साजरी करण्याचा व त्या खर्चाच्या बदल्यात एखाद्या गरजू मुलांना मदत करण्याचा संकल्प स्कूलमधील विद्यार्थ्यांनी केला.

सुदाम उबाळे यांच्या सेवाभावाचा यथोचित सन्मान!

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– राष्ट्रीय पाठशाळेचे सेवक सुदाम उबाळे यांनी गेल्या चार महिन्यांच्या चातुर्मास कालावधीत अत्यंत निष्ठेने, सेवाभावाने आणि आत्मीयतेने आपली सेवा बजावली.

त्यांच्या या समर्पित सेवाकार्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी आज आनंद समवशरण येथे समर्पण चातुर्मास समितीचे अध्यक्ष व सर्व विश्वस्त मंडळाच्या हस्ते त्यांचा सन्मान करून त्यांच्याप्रती आदरभाव व कृतज्ञता व्यक्त करण्यात आली.

त्यांची सेवाभावी वृत्ती, आत्मीयता आणि समर्पण निश्चितच कौतुकास्पद आहे. त्यांच्या या योगदानाबद्दल समर्पण चातुर्मास समितीच्या वतीने त्यांचे मनःपूर्वक आभार व पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा!

(पान १ वरून)

राहुल गांधी काँग्रेसमध्ये जितके पुढे गेले, पक्ष तितकाच मागे पडत गेला

या काँग्रेसच्या राजकीय कार्यपद्धतीवरही त्यांनी प्रश्न उपस्थित केले. संसदेत गोंधळ घालणे, कामकाजावर बहिष्कार टाकणे आणि त्यानंतर रस्त्यावर अराजकता निर्माण करण्याचा प्रयत्न करणे, ही पद्धत लोकशाही परंपरांच्या विरोधात आहे.

भाजपचे ज्येष्ठ नेते अमित शाह यांनी दिलेले आव्हानही महत्त्वाचे होते. ते म्हणाले, 'राहुल गांधी यांनी कोणत्याही चौकाचे नाव सांगावे, भाजपच्या युवा मोर्चाचे अध्यक्षच त्यांच्याशी चर्चे साठी पुरेसे आहेत.' मुद्दे गंभीर असतील तर त्यांनी संसदेत यावे आणि चर्चा करावी. भाजप प्रत्येक मुद्द्यावर चर्चेसाठी तयार आहे. हरियाणातील भाजपचे कार्यकर्ते घरोघरी जाऊन मतदारांना खरी माहिती सांगतील. मतदार यादी स्वच्छकरण्याचे काम लोकशाही मजबूत करण्यासाठी आहे, कोणाचाही अधिकार हिरावून घेण्यासाठी नाही. भाजपचे कार्यकर्ते शेतापासून ते रस्त्यापर्यंत राहुल गांधी यांच्या प्रचाराला उत्तर देतील. कारण ते जनतेतून आले आहेत आणि प्रत्येक व्यासपीठावर लोकशाही मार्गाने उत्तर देण्यास सक्षम आहेत.

भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी निवडणूक आयोग आणि एसआयआरबाबत करण्यात येणाऱ्या आरोपांना उत्तर दिले. २०१४, २०१९, २०२४, तसेच हरियाणा आणि महाराष्ट्रातील निवडणुकांमध्ये एसआयआर झाले नव्हते, तरीही काँग्रेसचा पराभव झाला. मोदी सरकारचा 'डिटेक्ट, डिलीट आणि डिपोर्ट' (शोधा, नाव मतदार यादीतून हटवा आणि देशाबाहेर पाठवा) हा संकल्प कायम असल्याचे शाह यांनी स्पष्ट केले. अशा परिस्थितीत काँग्रेसच्या सभा मतदारांच्या हक्कांसाठी नव्हे, तर घुसखोरांना वाचवण्यासाठी घेतल्या जात असल्याचे चित्र दिसत आहे. करनालमधील या सभेचा संदेश केवळ काँग्रेस आणि राहुल गांधी यांच्यावर टीका करण्यापुरता मर्यादित नव्हता. भाजपने या माध्यमातून आपली संघटनात्मक ताकद, सरकारची कामगिरी आणि विरोधकांच्या आरोपांना उत्तर देण्याची रणनीतीही जनतेसमोर मांडली. कायदा आणि जनकल्याणाच्या मुद्द्यांवर चर्चा रस्त्यावर होणार की संसदेत, हे आता देशातील जनता ठरवेल. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असलेल्या 'लोकशाही वाचवा, अराजकता दूर करा या यात्रेमुळे लोकशाहीची मुळे अधिक मजबूत होत आहेत, तर अराजकता निर्माण करण्याचे प्रयत्न अपयशी ठरत आहेत.